# परराष्ट्र सचिवांची अफगाणिस्तानच्या प्रभारी परराष्ट्र मंत्र्यांसोबत चर्चा

08 जानेवारी, 2025

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिसरी यांनी आज अफगाणिस्तानचे प्रभारी परराष्ट्र मंत्री मावलवी अमीर खान मुत्ताकी यांच्यासोबत दुबई येथे चर्चा केली. उभय बाजूंनी द्विपक्षीय संबंधांसोबत प्रादेशिक विकास संबंधित मुद्द्यांवर विस्ताराने चर्चा केली.

2. परराष्ट्र सचिवांनी अफगाणिस्तान सोबतचे भारताचे ऐतिहासिक मैत्रीपूर्ण संबंध आणि दोन देशांमधील नागरिकांचा परस्पर दृढ संपर्क अधोरेखित केला. या संदर्भात, त्यांनी अफगाण नागरिकांच्या तातडीच्या विकासात्मक गरजांना प्रतिसाद देण्याची भारताची तयारी असल्याचे नमूद केले.

3. उभय बाजूंनी सध्या प्रगतीपथावर असलेल्या भारतीय मानवतावादी सहाय्यता कार्यक्रमाचा आढावा घेतला. अफगाण नागरिकांप्रती निरंतर प्रतिबद्धता आणि सहाय्याबद्दल अफगाण मंत्र्यांनी भारतीय नेतृत्वाची प्रशंसा केली आणि आभार मानले. सध्या विकास कामांची आवश्यकता विचारात घेता, भारत सध्या प्रगतीपथावर असलेल्या मानवतावादी सहाय्यता कार्यक्रमांच्या सोबत नजीकच्या भविष्यात आणखी विकास प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याचा विचार करेल असा निर्णय घेण्यात आला.

4. अफगाण नागरिकांच्या गरजांना प्रतिसाद म्हणून भारताकडून अफगाणिस्तानला मानवतावादी सहाय्याचा विस्तार करण्याच्या देखील विचार केला जाऊ शकतो. भारताने आतापर्यंत अफगाणिस्तानला विविध मदत साहित्याचा पुरवठा केला आहे. ज्यामध्ये 50,000 मेट्रिक टन गहू, 300 टन औषधे, 27 टन भूकंप मदत साहित्य, 40,000 लीटर कीटकनाशके, 100 दशलक्ष पोलिओ डोस, 1.5 दशलक्ष कोविड लशी, व्यसनमुक्ती कार्यक्रमासाठी 11,000 युनिट हायजिन किट, 500 युनिट हिवाळ्यातील कपडे आणि 1.2 टन सॅनिटरी किट्स इ. बाबींचा समावेश होता.

5. अफगाणिस्तानच्या विनंतीला प्रतिसाद म्हणून पहिल्यांदा भारत आरोग्य क्षेत्र आणि निर्वासितांच्या पुनर्वसन सहाय्यासाठी आवश्यक असलेल्या मदत साहित्याचा पुरवठा करेल. उभय बाजूंनी अफगाणिस्तानच्या तरुण पिढी साठी अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या क्रीडा (क्रिकेट) सहकार्याला बळकटी देण्याविषयी देखील चर्चा केली. अफगाणिस्तानला मानवतावादी सहाय्य सहित मानवतावादी व्यापार आणि व्यावसायिक कृतींना सहाय्यासाठी चाबहार बंदराचा वापर करण्यावर सहमती दर्शविण्यात आली.

6. अफगाणिस्तानने भारताच्या सुरक्षेच्या चिंतेबाबत आपली संवेदनशीलता अधोरेखित केली. उभय बाजूंनी संपर्कात राहण्याचे आणि विविध स्तरांवर नियमित संपर्क सुरू ठेवण्याचे मान्य केले.

दुबई

08 जानेवारी, 2025